**प्रकल्प प्रवर्तक मे. राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना लिमिटेड, गट नं. ११५२, ११७०, १२९२, १३०४, १३०५, १३०६, १३०७, १३०८, १३०९, १३१०, १३११, राजारामनगर, पोस्ट-साखराळे, तालुका - वाळवा, जिल्हा-सांगली – ४१५ ४१४, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तारिकरण ७,०००.० टन प्रतिदिन पासून १५,०००.० टन प्रतिदिनपर्यत (८,०००.० टन प्रतिदिन विस्तार) आणि सहवीज निर्मिती २८.० मेगावॅट पासून ६८.० मेगावॅटपर्यत विस्तारिकरण (४०.० मेगावॅटने विस्तार) प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत-**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना लिमिटेड, गट नं. ११५२, ११७०, १२९२, १३०४, १३०५,१३०६, १३०७,१३०८,१३०९,१३१०,१३११,राजारामनगर,पोस्ट-साखराळे, तालुका - वाळवा, जिल्हा-सांगली – ४१५ ४१४, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्ताबित ऊस गाळप क्षमता विस्तारिकरण ७,०००.० टन प्रतिदिन पासून १५,०००.० टन प्रतिदिनपर्यत (८,०००.० टन प्रतिदिन विस्तार) आणि सहवीज निर्मिती २८.० मेगावॅट पासून ६८.० मेगावॅटपर्यत विस्तारिकरण (४०.० मेगावॅटने विस्तार) प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक १४ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थळ – गट नं. ११५२, मेनगेट जवळ, मे. राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना लिमिटेड, राजारामनगर, पोस्ट-साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली – ४१५ ४१४, महाराष्ट्र राज्य येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री प्रमोद माने, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांनी डॉ. मैनाक घोष, भाप्रसे, अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, सांगली, श्री निखिल घरत, सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर, स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

त्यापुढे आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठक सुरु करताना सांगितले की आज आपण प्रकल्प प्रवर्तक मे. राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना लिमिटेड, गट नं. ११५२, ११७०, १२९२, १३०४, १३०५, १३०६, १३०७, १३०८, १३०९, १३१०, १३११ राजारामनगर, पोस्ट-साखराळे, तालुका - वाळवा, जिल्हा-सांगली – ४१५ ४१४, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तारिकरण ७,०००.० टन प्रतिदिन पासून १५,०००.० टन प्रतिदिनपर्यत (८,०००.० टन प्रतिदिन विस्तार) आणि सहवीज निर्मिती २८.० मेगावॅट पासून ६८.० मेगावॅटपर्यत विस्तारिकरण (४०.० मेगावॅटने विस्तार) प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीस जमलेलो आहोत. त्याच बरोबर त्यांनी सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देशच प्रकल्प परिसरातील जनतेस प्रस्तावित प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे संभाव्य परिणाम व त्याबाबत

सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे. त्याच बरोबर त्यांनी सांगितले की, सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि वेळोवेळी केलेल्या सुधारित तरतुदींनुसार संवर्ग बी-१, अनुसुची ५ (जे)-साखर उद्योग व १ (डी) – सहविद्युत प्रकल्प अंर्तगत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास राज्य पर्यावरण मुल्यमापन समिती (SEAC-[State Environment Appraisal Committee]), पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

त्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन त्या अर्जास राज्य पर्यावरण मुल्यांकन समिती, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी ऑनलाईन मंजूरी दिनांक १९-१०-२०२५ रोजी प्रदान केलेली आहे. त्यानुसार संबंधीत अधि सूचनेनुसार प्रकल्प प्रवर्तकाने शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने व प्राथमिक मान्यता (ToR) मधे नमुद केलेनुसार प्रस्ताव म.प्र.नि. मंडळाच्या मुख्यालयास सादर केला होता. त्याअनुषंगाने सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र क्रमांक आय- २३२३१९३- २०२६ दिनांक १६.०६.२०२६ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली होती. सदरील दिलेल्या आदेशानुसार व प्रकल्प प्रवर्तकांनी सादर केलेल्या अर्जानुसार मा. जिल्हादंडाधिकारी , सांगली यांची मान्यता घेवून सदर बाबत उप प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक टाईम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक १०-०७-२०२६ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

| | |
|---|---|
| १) | प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य झोन, न्यु सेक्रेटरीएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१ |
| २) | मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली, |
| ३) | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,सांगली, |
| ४) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, सांगली, |
| ५) | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ |

| | |
|---|---|
| ६) | मा. सदस्य, सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, मुव्ही मॅक्स सिनेमासमोर, पहिला,दुसरा,तिसरा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२ |
| ७) | प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन बिल्डिंग, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ,कोल्हापूर – ४१६ ००२ |
| ८) | उप प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,३००/२, उद्योग भवन, शासकीय विश्रामधामजवळ, विश्रामबाग, सांगली – ४१६ ४१५ |
| ९) | तहसीलदार, तहसील कार्यालय,नवीन इमारत, कचेरी चौक, शिवाजीमहाराज पुतळ्याजवळ,ईश्वरपूर,तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली – ४१५ ४०९ |
| १०) | प्रांताधिकारी, प्रांताधिकारी कार्यालय, मुख्य प्रशासकीय इमारत,ईश्वरपूर, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली |
| ११) | मुख्याधिकारी, ईश्वरपूर नगरपरिषद, ईश्वरपूर, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली, |
| १२) | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालये- साखराळे, बोरगांव, हुबालवाडी, कापूससखेड, फारणेवाडी, बहे, नेर्ले, जुने खेड, तुजारपूर, तालुका-वाळवा,जिल्हा-सांगली |
| १३) | संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई – मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे. |

त्याच बरोबर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश दिनांक ११.०८.२०२६ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ नुसार खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, सांगली, किंवा त्यांचे प्रतिनिधी (उप विभागीय दंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी – प्रादेशिक अधिकारी - कोल्हापूर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली - **आयोजक**

त्यापुढे आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती फक्त प्रस्तावित प्रकल्पाबात स्थानिक लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, प्रकल्प नाकारणे किंवा प्रकल्पाची शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिक जनतेने जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येईल व बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व,दस्तावेज पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना यापुढील कार्यवाही करण्यासाठीची विनंती केली.

डॉ. मैनाक घोष, भाप्रसे, अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी-सांगली यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सांगितले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आलेली आहे, तर या समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, प्रकल्पाची शिफारस करणे तसेच प्रकल्प नाकारण्याचा अधिकार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी. या जनसुनावणीचा मुख्य उददेश प्रकल्प प्रवर्तक यांनी प्रकल्प विस्तारिकरणाचे जे नियोजन केलेले आहे, त्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी प्रकल्प परिसरातील स्थानिक जनता यांनी बैठकीत उपस्थित केलेल्या पर्यावरणीय सूचना,विचार, टीकाटिप्पणी, हरकती किंवा आक्षेप यांची नोंद बैठकीच्या इतिवृत्तात घेणे, तसेच प्राप्त झालेल्या लेखी सूचना बैठकीच्या इतिवृत्तासोबतशासनास सादर करणे हाच आहे. याची नोंद सर्व उपस्थितांना घ्यावी. त्यांना आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांना बैठकीचे कामकाज प्रक्रिया सुरु करण्याची सूचना केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यामध्ये मुख्यत्वे करुन प्रकल्प सल्ल्लागार यांनी सांगितले की परिसरातील ऊसाची वाढती उपलब्धता लक्षात घेऊन स्थानिक शेतक-यांच्या ऊसाचे योग्य वेळेत गाळप होऊन स्थानिक शेतक-यांचे नुकसान टाळण्यासाठी कारखाना प्रशासनाने ऊस गाळप क्षमता विस्तारिकरण करण्याचे योजिलेले आहे. कारखान्याकडे उपलब्ध क्षेत्र ६४.८६ हेक्टर असून प्रस्तावित प्रकल्प विस्तार हा प्रकल्पाकडे उपलब्ध असलेल्या क्षेत्रातच होणार असल्याने कोणाचेही विस्थापन होणार नाही, तसेच विस्तारिकरण प्रकल्पासाठी अतिरिक्त जमिनीची आवश्यकता नाही. प्रकल्पात विद्यमान २१.८५ हेक्टर जागा ही हरितपट्टा विकासासाठी वापरात आणलेली आहे. त्याचबरोबर प्रकल्पातील प्रस्तावित गुंतवणूक सीईआर खर्चासहित ₹ ३८३.० कोटी असून पर्यावरण व्यवस्थापनासाठी ₹ १५.६० कोटी गुंतवणूक करण्यात येणार आहे. उद्योग समुहाची पर्यावरण जबाबदारी खर्च (सीईआर) ₹ २.८५ कोटी एवढा असल्याचे सांगितले. प्रकल्प प्रवर्तक उद्योगात हरित तंत्रज्ञानाचा अवलंब करुन नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करत आहे. त्यासाठी पावसाचे पाणी साठवण प्रणाली अवलंबविण्याचा प्रस्ताव ठेवलेला आहे असे नमुद केले. त्यापुढे त्यांनी प्रक्रियेत उत्पन्न होणार औद्योगिक सांडपाण्यावर साखर कारखान्यातील कार्यरत ईटीपीचा क्षमता वाढविण्यात येणार आहे. साखर विभागातील कंडेनसेट पाणी सी.पी.यु मध्ये प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर हगा आसवणी प्रकल्पासाठी करण्यात येईल व उर्वरित हरितपट्टा व शेतीसाठी वापरण्यात येईल याबाबतची माहिती दिली. तसेच, प्रस्तावित प्रकल्पात ७२ मीटर उंचीची चिमणी (stack) असलेला इलेक्ट्रो-

स्टॅटिक-प्रेसिपिटेटर (ईएसपी) कार्यान्वित करण्यात येणार आहे असे सांगितले. त्याचबरोबर प्रस्तावित विस्तारिकरणामुळे प्रकल्पात शंभर व्यक्तींना रोजगाराची संधि मिळणार असल्याचे सांगितले. तदनंतर प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरण पूर्ण करताना सांगितले की सदरहू प्रकल्पामुळे स्थानिक ग्रामपंचायतीच्या महसूलात वाढ होईल. तसेच स्थानिकांना रोजगाराची संधि प्राप्त होईल. त्यामुळे येथील सामाजीक, आर्थिक जीवनमानात आमूलाग्र बदल होतील. सदरहू प्रकल्प हा स्थानिक परिसर, महाराष्ट्र राज्य व देशाच्या हिताचा आहे असे नमुद केले.

आयोजक यांनी सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर वर नमुद केल्याप्रमाणे प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आल्यानंतर उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली व इतर कार्यालयांकडे प्रत्यक्ष व ईमेलव्दारे एकूण ०९ (नऊ) लेखी सूचना, हरकती/आक्षेप तसेच १३४ टीकाटिप्पणी असे एकंदरीत १४३ सूचना/आक्षेप/टीकाटिप्पणी प्राप्त झालेल्या आहेत. त्यापुढे त्यांनी म.प्र.नि. मंडळ कार्यालयात ज्या ०९ (नऊ) सूचना/आक्षेप प्राप्त झालेल्या आहेत, त्यापैकी ०६ लेखी सूचना/आक्षेप प्रत्यक्ष कार्यालयात येऊन समक्ष सादर करण्यात आलेल्या आहेत व इतर तीन सूचना/आक्षेप ईमेलव्दारे प्राप्त झालेल्या आहेत त्यांची सारांश माहिती सांगितली-

**त्यात श्री मोहन माने, साखराळे यांनी** हरकत नोंदविलेली असून मुख्यकरुन कारखाना जो गट नं. १७५२ वर उभारण्यात आलेला आहे, त्याबाबत परवानग्या घेण्यात आलेल्या नाहीत. तसेच प्रस्तावित प्रकल्पामुळे हवा, जल, ध्वनी या प्रदूषणाबाबत तसेच परिसरातील नागरिकांच्या, जनावरांच्या आरोग्यावर परिणाम होणार आहे असा आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे.

त्याचप्रमाणे **साखराळे, आंबेडकरनगर येथील नागरिकांनी विविध मुद्दे उपस्थित केलेले आहेत.** त्यात प्रकल्प प्रवर्तक यां नी पर्यावरण अनुमती प्राप्त करण्याअगोदरच परवानगी न घेता काम सुरु केलेले असून ८०-९०% काम झालेले आहे असा आक्षेप घेण्यात आलेला आहे. तसेच शासनाकडून जी प्राथमिक मान्यता (Terms of Reference) घेण्यात आलेली आहे, त्याबाबत कुठला आधार, कुठली पत्रे सादर केली, याबाबत काहीही माहिती उपलब्ध करण्यात आलेली नाही असा आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे.

तसेच पर्यावरण सल्लागार यांनी पाहणी करताना व पाण्याचे, हवेचे व इतर नमुने जे गोळा केले (sampling procedures) त्याबाबत आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. प्रस्तावित प्रकल्पात जो झेडएलडी सयंत्रणा जी कार्यान्वित करण्यात येणार आहे, त्याबाबत तांत्रिक बाबी (technical specifications) याबाबत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. तसेच या प्रस्तावित प्रकल्पासाठी प्रकल्प प्रवर्तक यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्रकल्प स्थापना अनुमती (Consent to Establish-C to E) प्राप्त करण्यात आलेली नाही असे विविध मुद्द्यांवर आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.

**तसेच श्री शंकरराव भीमराव मोहिते, राहणार-साखराळे** तसेच ग्रामस्थ साखराळे यांनी आक्षेप नोंदविला की कार्यरत प्रकल्पापासून जल, वायू, ध्वनी यांचे प्रदूषण होतच आहे. जर प्रकल्प उत्पादन क्षमतेच्या वाढीस परवानगी दिली, तर प्रदूषणात वाढच होईल.

**श्री सुनील फराटे, स्वतंत्र भारत पार्टी** यांनी आक्षेप नोंदविला की आतापर्यंत कारखान्यावरच ब-याच वेळा कारवाई झालेली आहे. त्याबाबत हरित लवाद न्यायाधिकरण, पश्चिम विभाग, पुणे येथे दाखल

करण्यात आलेली याचिका ही प्रलंबित आहे. तर त्याचा संदर्भ घेऊनच विस्तारिकरणाबाबत शासनाने पुढील निर्णय घेण्यात यावा.

**श्री रविंद्र रघुनाथ पिसाळ** यांनी कार्यरत प्रकल्पातील प्रदूषणाचे मुद्दे उपस्थित करुन त्याबाबत सर्व विचार, ऊहापोह करुन शासनाने पुढील निर्णय घ्यावा असे सुचित केलेले आहे. जर कारखान्याने काही चुकीच्या गोष्टी केलेल्या आढळल्या, तर विस्तारिकरणाचे काम त्वरित बंद करण्यात यावे.

**श्री घनश्याम उर्फ जयकर दीनकर जाधव** यांनी मुद्दा उपस्थित केला की कारखान्याने पर्यावरण अनुमती प्राप्त करण्याअगोदरच विस्तारिकरणाचे काम सुरु केलेले आहे. तर त्याबाबत प्रकल्पातील कामाचे लेखापरिक्षण करण्यात यावे. जर तसे केलेले असेल, तर पुढील विस्तारिकरण त्वरित बंद करण्यात यावे.

त्याचप्रमाणे साखराळे व बोरगाव येथील नागरिकांनी विविध मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यात मुख्यत्वे विविध शासकीय प्राधिकरणाकडुन पूर्वपरवानगी घेण्यापूर्वीच काम सुरु केलेले आहे काय याबाबत आक्षेप नोंदविलेला आहे. तसेच जो पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवाल (ईआयए) जो तयार करण्यात आला, जी माहिती प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी दिलेली आहे, त्याबाबत ग्रामस्थांनी २९ मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

त्यापुढे आयोजक यांनी मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी त्यांच्या पर्यावरणी सूचना,विचार,टीकाटिप्पणी किंवा हरकती, आक्षेप हे नोंदविण्याचे आवाहन केले. आपली भूमिका नोंदविताना प्रथम आपण आपले नांव व राहण्याचे ठिकाण सांगावे. तसेच तेचतेच मुद्दे उपस्थित करण्यात वेळ घालवू नये, जेणेकरुन इतरांनाही बोलण्याची संधि देता येईल. तसेच आयोजक यांनी उपस्थितांना सांगितले की आपण उपस्थित करण्यात येणा-या मुद्द्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे, तसेच सदरहू जनसुनावणीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येणार आहे. तरी ज्यांना सूचना/आक्षेप नोंदविण्याचे आहे, त्यांनी हात वर करा, जेणेकरुन प्रत्येकाला माईक देण्यात येईल.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री महादेव पवार, अध्यक्ष, शेतकरी संघटना-साखराळे, पोस्ट साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली:-**

यांनी सांगितले की मी लेखी स्वरुपात तक्रार सादर केलेली आहे मळीच्या पाणी संदर्भात आहे ती पहावी. राजारामबापू साखर कारखानचे मळीचे पाणी हे आमच्या शेतात येते. त्यामुळे शेतीचे नुकसान झालेले आहे. त्याची भरपाई कारखान्याने आम्हांला द्यावी. तसेच प्रकल्पाच्या धुरांडयातून सोडलेली बगॅसची पांढरी राख व काळी राख ही आमच्या गावात तसेच आमच्या आंबेडकरनगरमध्ये ब-याच प्रमाणात पडते. त्यामुळे पिकांचे नूकसान होत आहे. तसेच कंपनीच्या मळीचे पाणी हे नदीच्या पाण्यात मिसळते, त्यामुळे मासे ब-याच प्रमाणात मरतात. याची दखल कंपनीने घ्यावी असे त्यांनी सांगितले.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी सांगितले की आपण उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे.

२) **श्री रविंद्र रघुनाथ पिसाळ, राहणार- पोस्ट साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली:-**

यांनी सांगितले की मी लेखी स्वरुपात तक्रार सादर केलेली आहे, या कारखान्याची गाळप क्षमता ६,००० टन प्रतिदिन असताना आम्हांला एवढा त्रास होत आहे, तर गाळप क्षमता ही १५,००० प्रतिदिन झाल्यानंतर काय परिस्थिती होईल याची कल्पनाच करता येत नाही. उत्पादनात वाढ झाल्याने मळीचे पाण्यातही मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे. तसेच परिसरात व आंबेडकरनगरात प्रकल्पातील बगॅसची पांढरी राख मोठ्या प्रमाणात पडते. रात्रीच्या वेळी जर एखादा काळ्या रंगाचा माणूस घराबाहेर पडला, तर तो पांढराच होतो. कारखान्यातील राख ही आमच्या जेवणात तसेच कपडयांवर पडत असल्याचे सांगितले. कारखाना चालू असताना पाहणी करण्यात यावी, म्हणजे आपणास दिसेल की किती मोठ्या प्रमाणात कंपनीची राख पडत असते. त्यामुळे बागायती शेतीचे नुकसान होत आहे. शेतातील पीकांचे उत्पादनात राखेमुळे मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे. कारखाना अधिकारी सांगतात की आम्ही कारखान्यात मशिन्स बसविलेली आहे, तसेच नविन प्रदूषण नियंत्रणसयंत्रणा कार्यान्वित केलेली आहे. कारखाना चालू असताना परिसराची पाहणी करावी असे त्यांनी नमुद केले. आता जर १५,०००.० टनप्रतिदिन उत्पादन झाले, तर काय होईल? असा मुददा त्यांनी उपस्थित केला. तसेच आम्हांला असे दिसते की विस्तारिकरण प्रकल्पाची अगोदरच ८०% उभारणी करण्यात आलेली असुन नंतर ही पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यात येत आहे. त्यामुळे या बैठकीचा मी निषेध करतो. त्याच बरोबर मळीच्या पाण्यासाठी कारखान्याने कॅनॉल काढलेला आहे. आमच्या गावाला पाणीपुरवठा योजना आहे व वर्षाला पाणीपट्टी कपात करुन घेतात त्याचबरोबर ते मळीचे पाणी नदीत मिसळत आहे व ते मळीचे पाणी फिल्टर करुनच आम्हांला प्यायला देत आहेत, म्हणजे दुषित पाणी नदीत मिसळून ते परत फिल्टर करुनच आम्हांला प्यायला देतात असे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर आता जी राख पडत असते, ती दिवसा बंद ठेवतात व ती रात्री मोठ्या प्रमाणात वातावरणात सोडतात असे सांगितले. तरी आमच्या तक्रारीचा विचार करुन ती शासनास पाठविण्यात यावी अशी विनंती केली.

त्यावर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपण उपस्थित केलेल्या मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

३) **श्री रघुनाथदादा पाटील:-**

यांनी सांगितले की आता बैठकीत स्थानिकांनी जो आक्षेप उपस्थित केला की प्रस्तावित प्रकल्पाचे काम हे सुरु झालेले आहे, हे खरे आहे की खोटे आहे याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे असे नमुद केले.

त्यावर प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आता स्थानिकांनी आक्षेप नोंदविला की विस्तारिकरण प्रकल्पाचे ५०-७०% काम झालेले आहे. परंतु प्रकल्पात जे काम चालू आहे, ते प्रकल्पातील steam consumption कमी करण्याचे काम चालू आहे. तसेच साखर प्रकल्पात जी यंत्रणा कार्यान्वित होती, ती जुनी झालेली असल्यामुळे ती बदलण्याची (replace) आवश्यकता होती. त्या जुन्या मशिनरीमुळे Steam consumption हे जास्त होत होते. त्यासाठी व ऊसातील रस चांगल्या प्रकारे काढण्यात यावा (juice extraction) यासाठी प्रकल्पातील उत्पादनासाठी वापरण्यात येणा-या जुन्या मशिनरी बदलण्याचे काम चालू असल्याचे सांगितले. त्या कामाचा विस्तार प्रकल्पाशी काहीही संबंध नाही तसेच कार्यरत प्रकल्पाची गाळप क्षमता ही ७,०००.० टन प्रतिदिन एवढी असून तीच राहणार आहे असे सांगितले. तसेच यैथे उपस्थितांनी राखेबाबत आक्षेप नोंदविला की राख ही शेतात, कपड्यावर पडते त्यावर पर्यावरण सल्लागार यांनी बॉयलर

साठी आवश्यक असलेली ईएसपी (ESP) हवा प्रदुषण नियंत्रण संयंत्रणा बसविण्यात आलेली असून ती सातत्याने कार्यान्वीत असल्याबाबत सांगितले. तसेच प्रकल्पात केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी बंधनकारक केलेली Online Continuous Emissions Monitoring System (OCEMS) कार्यान्वित असून त्याचे एक कनेक्शन केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ,नवी दिल्ली येथील कार्यालयात व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई येथील कार्यालयात जोडलेले आहे. त्यामुळे पारित मानकांपेक्षा जराही जास्त उत्सर्जन झाले, तर लगेचच दोन्ही शासकीय संस्थेकडून मोबाईलवर अलर्ट संदेश पारित करण्यात येतो, त्यामध्ये मानवी हस्तक्षेप करता येत नाही असे त्यांनी सांगितले. ती सयंत्रणा ऑनलाईन सतत कार्यरत असते असे नमुद केले.

येथे **<u>श्री रविंद्र रघुनाथ पिसाळ, राहणार- पोस्ट साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली यांनी</u>** आक्षेप नोंदविला की डिसेंबर, जानेवारी महिन्यात दिवसा व रात्री पाहणी करण्यास यावी, म्हणजे अधिका-यांना राख किती पडते याची जाणीव होईल असे नमुद केले.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांची नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.

४) **<u>श्री शशीकांत माने, राहणार- पोस्ट साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली:-</u>**

यांनी सांगितले की माझा विस्तारिकरण प्रकल्पास १००%विरोध आहे. कारण कार्यान्वित प्रकल्पामुळे परिसरातील लोकांना जो प्रदूषणाचा त्रास होतो, तो कारखाना व्यवस्थापनाने जराही कमी केलेला नाही. आमचा विकासाला अजिबातच विरोध नाही. पर्यावरण सल्लागार यांनी अतिशय माहितीपूर्वक सादरीकरण केलेले आहे. आमच्या वडिलांची जागा प्रकल्पात अधिग्रहित करण्यात आलेली आहे. विकासामुळे आर्थिक स्थैर्य यावे हीच कारखाना संस्थापकांचे ध्येय होते. त्यासाठीच आम्ही स्वखुशीने कारखान्यास जागा दिलेली होती परंतु सदयस्थितीमध्ये कारखान्यामुळे होणा-या प्रदूषणाचा त्रास होत आहे असे सांगितले. आमची निवासी जागा ही प्रकल्पापासून फक्त १०-१५ फुटांवरच आहे, गेले ३-४ वर्षे आम्हांला बगॅसचा खूपच त्रास होत असून त्यामुळे परिसरातील स्थानिकांना पोटाचे, छातीचे, फुप्फुसाचे विकार झालेले आहेत. विशेषतः लहान मुलांना खूपच त्रास होतो असे नमुद केले. पर्यावरण सल्लागारांकडे आधुनिक तपासणी यंत्रणा असल्यास आमचे व पर्यावरण सल्लागार यांचे फुप्फुसांची तपासण्यात करण्यात यावी, जर माझ्या फुप्फुसात बगॅस नसेल, तरच माझा प्रकल्पास पाठिंबा राहिल असे सांगितले.

या बगॅसच्या प्रदूषणामुळे माझ्या वडिलांना दम्याचा त्रास होऊन त्यांचा मृत्यू झाला. शेजारील एक मेजरसुध्दा दम्यानेच, श्वसनाच्या त्रासानेच मृत्यूमुखी पडलेले आहेत. परिसरात बरेच जेष्ठ नागिरक व वयस्कर व्यक्ती राहतात. त्या जवळजवळ सर्वांनाच श्वसनाचा त्रास आहे. त्याचे कारण सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे सल्फर-डाय-ऑक्साईड हे मुख्य कारण आहे. यामुळे फुप्फुसांचे, श्वसनांचे विकारांनी लोक त्रस्त झालेले असुन मानसिक स्वास्थ्य बिघडलेले आहे. चिडचिडपणा वाढलेला आहे. याचा अर्थ येथील लोकांचे आरोग्य हे पूर्णपणे धोक्यात आहे असे नमुद केले.

तसेच मी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा निषेध करतो. त्यांनी ग्रामपंचायतीला प्रस्ताव सादर केला. तर त्यात छोटी पुस्तिका ही मराठीत दिलेली असून मुख्य विषयाचा अहवाल हा मात्र इंग्रजीत दिलेला

आहे. येथील सर्व सामान्य माणसांना, शेतक-यांना इंग्रजी अहवाल कसा वाचता येईल, कारण त्यांना इंग्रजी समजत नाही. विस्तारिकरण प्रकल्पामुळे काय फायदे व तोटे होणार हे आम्हांला कळलेले नाही. आम्ही तज्ज्ञ व्यक्तीकडून समजून त्यावर आक्षेप १९ मुद्द्यांचे आपणास सादर केलेले असून त्याचे उत्तर आम्हांला देण्यात यावे असे सांगितले.

त्याचबरोबर प्रकल्प अहवालात प्रकल्पाचे व साखराळे गावाचे अंतर चुकीचे दाखविलेले आहे. पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्प परिसरात जे पर्यावरणीय सर्वेक्षण केले, ते मार्च, एप्रिल व मे या तीन महिन्यात केलेले आहे. त्यावेळची प्रदूषणाची पातळी अहवालात दिलेली आहे. मात्र हंगाम चालू असताना जर परिसराचे पर्यावरणीय सर्वेक्षण करण्यात आले असते,तर सर्व प्रदूषणाची पातळी ही निश्चितच वेगळी आली असती. या माझ्या मुद्द्याची नोंद घेण्यात यावी असे सांगितले. तसेच माझा कुठल्याही विकासाला विरोध नाही. पण आमचा बळी देऊन विकास होत असेल, तर तो आम्हांला नको आहे. अशा प्रकारचे अनेक मुद्दे लेखी आक्षेपात नोंदविलेले आहेत. तरी आम्हांला न्याय देऊन योग्य तो निर्णय घेण्यात यावा असे सांगितले.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उपस्थित केलेल्या आक्षेपांची नोंद घेण्यात आलेली असून प्रकल्प प्रवर्तक यांना आपण सादर केलेल्या लेखी आक्षेपांना लेखी स्वरुपात उत्तर देण्याची सूचना करण्यात आलेली असुन आपले लेखी आक्षेप व प्रकल्प प्रवर्तक यांनी आपणास दिलेले लेखी उत्तर हे शासनास सादर करण्यात येतील असे सांगितले.

तदनंतर पर्यावरण सल्लागार यांनी स्पष्टीकरण दिले की भारत सरकारने पारित केलेल्या पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अधिसूचना, २००६ मधील निर्देशांनुसारच प्रकल्प परिसराच्या १० कि.मी. परिघात पर्यावरणीय सर्वेक्षण करण्यात आलेले असून पारित निर्देशांनुसार प्रकल्प प्रभावित गावातील ग्रामपंचायत कार्यालयात जनसुनावणीच्या तीस दिवस अगोदर सर्व ग्रामस्थांच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ कार्यकारी सारांश अहवाल (Executive Summary) हा स्थानिक भाषा मराठी मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेला असल्याचे सांगितले. तसेच स्थानिकांनी जे मुद्दे लेखी स्वरुपात सादर केलेले आहेत, त्यास लेखी स्वरुपात उत्तरे देण्यात येईल असे सांगितले.

५) **<u>श्री सुहास रघुनाथ पाटील, राहणार-साखराळे गाव, तालुका- वाळवा, जिल्हा-सांगली:-</u>**

यांनी सांगितले की गेले १५-२० वर्षापूर्वी या कार्यक्षेत्रात ऊसाचे उत्पादन हे २०-२२% असे होते. येथील शेतक-यांनी शेतीत प्रगती करुन १०० टनापर्यंत उत्पादन केलेले आहे. परिसरातील ऊस उत्पादन हे वाढलेले आहे. त्यामुळे त्याचे वेळेत गाळप होणेही महत्वाचे आहे. आमचा विकासाला विरोध नाही, पण स्थानिकांनी प्रदुषणामुळे त्रासाचे जे मुद्दे उपस्थित केले आहेत, त्याची दखल कारखाना प्रशासनाकडून घेण्यात यावी असे नमुद केले. तसेच या प्रकल्पासाठी बहुतांश साखराळे गावाने जमिनी दिलेल्या आहेत, तरी त्यांना न्याय देण्यात यावा असे सांगितले.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या सूचनांची नोंद घेण्यात आली असून सर्व लेखी प्रश्नांना लेखी स्वरुपात उत्तर देण्याची सूचना मा. अध्यक्षांच्या वतीने प्रकल्प प्रवर्तकांना केली व तो सर्व दस्तावेज शासनास सादर करण्यात येईल असे सांगितले.

६) **<u>एडव्होकेट जितेंद्र कामत:-</u>**

यांनी सांगितले की या पूर्वी १०-०२-२०२६ ला हरकती लेखी स्वरुपात सादर केलेल्या आहेत. तसेच आज मी माझे वकिलपत्र आणि माझे लेखी युक्तीवाद व काही ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे म्हणणे शपथ पत्राव्दारे मांडत आहे.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी लेखी सूचना/आक्षेप देण्याची सूचना केली असता एडव्होकेट यांनी लेखी युक्तीवाद सादर करणार असल्याचे सांगितले.

एड्व्होकेट यांनी प्रतिपादन केले की येथे काही ग्रामस्थांनी प्रदूषणाच्या त्रासाबाबत काही मुद्दे सांगितले आहेत, ते परत मी मांडत नाही. सर्व मुद्दे लेखीस्वरुपात हरकतीमध्ये सादर केलेले आहेत. मात्र काही तोंडी मुद्दे मांडत असल्याबाबत सांगितले –

मे. राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना लिमिटेड, राजारामनगर, पोस्ट-साखराळे,तालुका-वाळवा,जिल्हा-सांगली यांचा ५६ व्या अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसते की पान नं. २६ वर ३ नंबरच्या मुद्द्यावर असे नमुद केलेले आहे की - चालू हंगाम - २५-११-२०२४ आणि हंगाम बंद केला – ०३-०३-२०२५. ज्या संबंधीत संस्थेमार्फत अहवाल दिलेला आहे याचे अवलोकन केले असता असे निर्देशनास येते की पर्यावरण सल्लागार यांनी जे विविध नमुने गोळा केलेले आहेत (sample/s of collection), त्यात Ambient Air चे नमुने गोळा करण्यात आले, ते १२-०३-२०२५ ला घेण्यात आले, म्हणजे कारखान्याचा हंगाम संपल्यानंतर घेण्यात आलेले आहे. ते हंगाम चालू असताना घेतले असते, हवा प्रदूषणाची पातळी ही कळली असती. तर हंगाम चालू असताना हवा प्रदूषण नमुना घेण्यात काय अडचण आहे? असा मुददा उपस्थित केला.

तदनंतर त्यांनी पुढील मुददा ध्वनी प्रदूषणाबाबत उपस्थित केला असून त्यांनी सांगितले की : "पान नं. ६८ वर जोडपत्र (Annexure) वर आहे की साखराळे गावाचे ध्वनी पातळी दिवसा ५४.२ डेसिबल तर रात्री ४४.० डेसिबल दर्शविलेली आहे] यात तफावत आहे" असे माझे म्हणणे आहे. त्यापुढे त्यांनी ज्या मुदयामध्ये तफावत आहे तो मुददा म्हणजे या प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवालात मुद्दा क्रमांक ९.३.६ – ध्वनी प्रदूषण या मुद्द्यामध्ये असे नमुदे केलेले आहे की " प्रकल्पातून निर्माण होणारा ध्वनी हा मर्यादित स्वरुपाचा असेल, त्यामुळे कारखान्याच्या आवारातील ध्वनीची मात्रा ही दिवसा ७५.० डेसिबल असेल, तर रात्री ७०.० डेसिबल असेल. मात्र अहवालात नमुद केलेले आहे की दिवसा ध्वनी पातळी दिवसा ५४.२ डेसिबल तर रात्री ४४.० डेसिबल दर्शविलेली आहे. तर अहवालातील ध्वनी पातळी ही हंगाम चालू असताना दिलेली आहे की हंगाम बंद झाल्यावर दिलेली आहे याचे स्पष्टीकरण केलेले नाही". त्यापुढे त्यांनी पुढील मुद्दा सांगताना ते म्हणाले की, हंगाम चालू असताना का बंद असताना नमुने घेतले हे तारखेवरुन लक्षात येते कारण Date of Receipt of Sample – 24-03-2025. तारखा या नोंदवून घेण्यात याव्यात, कारण या तारखा महत्वाच्या आहेत असे नमुद केले.

त्यापुढे त्यांनी माती परिक्षणासंदर्भात मुददा उपस्थित केला त्यामध्ये त्यांनी सांगितले की, मृदा/माती परिक्षणाची तारीख Date of Sampling – 19-03-2025 & 21-03-2025; व Date of receipt of Sample – 24-03-2025; अशी आहे याचा अर्थ सर्व नमुने हे हंगाम संपल्यानंतरच गोळा करण्यात आलेले आहेत असा मुददा उपस्थित केला.

त्यापुढे त्यांनी_भूगर्भातील पाण्याचे नमुन्याचा मुदा उपस्थित केला. त्यामध्ये नमुने गोळा केल्याची तारीख – २०-०३-२०२५ व २१-०३-२०२५ अशीच आहे तर Date of Receipt of Sample – 24-04-2025 अशी आहे. या तारखेस ते वसंतदादा शुगर संस्थेत पृथ्थकरणासाठी सादर करण्यात आले असे सांगितले. तदनंतर पुढील मुद्दा हा जमिनीवरिल पाण्याचे नमुने (Surface Water Samples) बाबत होता ज्यामध्ये पाण्याचे नमुने गोळा केल्याची तारीख – २०-०३-२०२५ व Date of Receipt of Sample – 24-04-2025 अशी आहे. या तारखेस ते वसंतदादा शुगर संस्थेत पृथ्थकरणासाठी सादर करण्यात आले असे सांगितले. तसेच त्यापुढे त्यांनी हरकतीसोबत फोटोग्राफसुध्दा जोडलेले असून आमची हरकत आहे की शासनाच्या संबंधित विभागांची पूर्वपरवानगी न घेता ८०-९०%काम हे पूर्ण झालेले आहे. माझ्या १०-०२-२०२६ च्या हरकतीसोबत अनु.क्रं. १-५ जोडलेले आहेत. त्याचे आपण अवलोकन करावे. त्यात बॉयलरची जी उभारणी केलेली आहे, ती तपासण्यात यावी असे सांगितले. तसेच त्याबरोबर प्रकल्प अहवालात नमुद केल्यानुसार प्रकल्प प्रवर्तक यांनी विस्तारिकरण केल्याचे मान्य केलेले आहे. ज्यामध्ये अहवालात असे लिहिलेले आहे की "शेतक-यांनी आपला संपूर्ण ऊस कारखान्यास देऊन सहकार्य करावे व पूर्व कार्यक्षेत्रातील सभासद ऊस उत्पादन एकरी २८ टन होते. मात्र व्हीएसआयच्या सहकार्याने राबविलेल्या लक्ष १०० टनाचे या उपक्रमाने गेल्या काही वर्षात हजारो शेतकरी एकरी १०० टन अधिक उत्पादन घेण्यास यशस्वी झालेले आहेत". त्यापुढे त्यांनी असे सांगितले की, प्रकल्प प्रवर्तकांनी विस्तारिकरण केलेले असून ऊस पाठविण्याचे आवाहन स्थानिक शेतक-यांना केलेले आहे त्यामुळे आजची सुनावणी ही कसली जनसुनावणी व ही जनसुनावणी हा फार्स आहे असा मुददा उपस्थित केला.

त्यापुढे त्यांनी कायदेशीर पैलू (Legal Aspect) बाबतचा मुददा उपस्थित करतो म्हणून असे सांगितले की, बैठकीत पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात आधुनिकीकरण करण्यात येत आहे, जुन्या मशिनरी-यंत्रसामुग्री ही बदलावी लागतच आहे. मात्र प्राथमिक मान्यता – टीओआरच्या क्रमांक ३.८ च्या निर्देशानुसार ०८ जून, २०२२ च्या परिपत्रकानुसार प्रकल्प प्रवर्तकांनी पूर्तता केलेली आहे का याचा वेळोवेळी नागरिकांनी अहवाल मागितला असता तो उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. माझे मत आहे की ०८ जून, २०२२ च्या परिपत्रकानुसार कारखान्याने पूर्तता केलेली नाही. प्रकल्प प्रवर्तकांनी अटी व शर्तींचा भंग केलेला असल्याने माझा आक्षेप मान्य करण्यात यावा असे सांगितले, तसेच प्रकल्प प्रवर्तकांना प्राप्त झालेल्या प्राथमिक मान्यतेत-टीओआर मध्ये अजुनही एक अट आहे, ती म्हणजे वैधानिक अनुपालन (statutory compliance) जो पान नं. ११ वर अनुक्रमांक १.३. – "Latest compliance report only certified by the Regional Officer of MoEF & CC for the conditions stipulated in the environmental and CRZ clearances of the previous phase(s) for the expansion project shall be submitted". या प्रमाणे कारखान्याने कोणत्याही अटी व शर्तीचे अनुपालन केलेले नसल्याने प्रकल्प प्रवर्तकांचा विस्तारकरण प्रस्ताव हा नामंजूर करण्यात यावा असे मत मांडले.

तदनंतर पुढील मुददा मांडताना त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी होण्यापुर्वी सहवीज प्रकल्प विस्तारिकरण करण्याचे कोणतेही बांधकाम किंवा प्रत्यक्ष काम सुरु करण्यापुर्वी जर कायदेशीर बाबी बघितल्या तर भारत सरकारच्या पर्यावरण अधिसूचना, २००६ नुसार कोणताही प्रकल्प सुरु किंवा विस्तारिकरण करण्यासाठी पूर्व पर्यावरण अनुमती प्राप्त करणे बंधनकारक आहे. त्याचबरोबर त्यासाठी आगाऊ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करणे बंधनकारक आहे, असे असतानाही पूर्वपरवानगी न घेता ८०-९०%काम हे करण्यात आलेले

आहे. त्यासाठी पर्यावरण अनुमती, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रकल्प स्थापन अनुमती (Consent to Establish-C to E) शिवाय प्रकल्प स्थानावर एकही वीट उभारता येत नाही. त्यामुळे हे पर्यावरण कायद्याचे उल्लंघन मानले जाते व असे केल्यास त्यावर पुढील कारवाईचे निर्देश दिल्यानुसार म.प्र.नि. मंडळ काम थांबविण्याचे आदेश पारित करु शकते, त्याच बरोबर तीन वर्षे प्रकल्प लांबणीवर टाकू शकते, तसेच आर्थिक दंड व न्यायालयाची कारवाई करण्याचे अधिकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिलेले आहेत. मात्र कारखान्याने परवानगी घेतली असल्यास त्याचे स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही.

त्याचबरोबर त्यांनी पुढे मुददा उपस्थित केला की, या कारखान्याविरुध्द १५ जुलै, २०२२ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम ३३अ नुसार कारवाई करण्यात आलेली आहे व कारखाना ७,००० टीसीडी उत्पादन करताना मप्रनि मंडळाच्या अनुमतीचे पालन न केल्याने पाच लाखाची बँक हमी म.प्र.नि.मंडळाने जप्त केलेली माहिती राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पश्चिम विभाग, पुणे येथील याचिकेत म.प्र.नि.मंडळाने दिलेली आहे असे सांगितले. त्याचप्रमाणे ग्रामस्थांचे प्रतिज्ञापत्र (affidavit) दाखल केलेले आहे. ज्यामध्ये श्री बाजीराव विष्णु माने, वय वर्षे – ६८, कारखान्यामुळे त्यांच्या गावात काळी काजळी व पाढंरी राख येत आहे व कारखान्याच्या बगॅसमुळे ती आजूबाजुच्या गावात उडत येते आहे. तरी ग्रामस्थांची तळमळ हीच आहे की या कारखान्याच्या प्रदूषणामुळे परिसरातील सर्व ग्रामस्थांना त्रास होत आहे. तसेच जाण्यायेण्यासाठी एकच रस्ता आहे ज्यावर मोठया प्रमाणात प्रदूषण होत आहे, त्यामुळे ग्रामस्थांना गावात राहणे मुश्किल झालेले आहे असे सांगितले. त्यापुढे त्यांनी सांगितले की, म.प्र.नि.मंडळाने पारित केलेल्या दिनांक २१-०९-२०२५ च्या प्रकल्प कार्यान्वित अनुमती नुतनीकरणात (Renewal of Consent to Operate) शेड्युल १ मधील डी अटी व शर्तीचे पालन होते की नाही हे बघावे लागेल. तसेच ग्रामस्थांची तळमळ व वैधानिक पूर्तता पाहता कार्यरत प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे ग्रामस्थ त्रस्त आहेत, त्यात विस्तारिकरणास परवानगी दिल्यास प्रदूषणात वाढ होईल व ग्रामस्थांना राहणेच अशक्य होणार आहे. तरी ग्रामस्थांतर्फे विस्तारिकरणास माझी हरकत असून हा विस्तारिकरणाचा प्रस्ताव रद्द करावा ही विनंती असे मुददे उपस्थित केले.

यावर आयोजक यांनी पर्यावरण सल्लागार यांनी एडव्होकेट जितेंद्र कामत यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्यात देखरेखेबाबत (Monitoring) आणि विस्तारिकरणाबाबत प्रकल्प प्रवर्तकांना विनंती आहे की त्यांनी स्पष्टीकरण द्यावे असे सांगितले. त्यावर प्रकल्प प्रवर्तक यांच्या मार्फत श्री मोरे यांनी सांगितले की, आता प्रकल्पात आधुनुकीकरण चालू करण्यात आलेले आहे, कारण कारखाना हा १९७० साली सुरु झाला त्यामुळे प्रकल्पातील बरीच यंत्रसामुग्री ही जुनी झालेली असून सदर जुनी यंत्रसामुग्री ही नियतकालावधीनंतर बदलणे हे गरजेचे आहे. त्यामुळे त्याचा आणि विस्तारिकरण प्रकल्पाचा काहीही संबंध नाही व आधुनुकीकरणामुळे आपल्या कारखान्याची कार्यक्षमता वाढणार आहे. त्याचबरोबर बॉयलर, टरबाईन मधील काही यंत्र सामुग्री बदलण्याचे काम चालू आहे. ज्यामुळे बगॅसची बचत होऊन त्याचा फायदा हा कारखान्यासच होणार आहे व कारखाना हे सर्व काम शासनाच्या नियमास अधिन राहून करत आहे असे सांगितले.

**७) श्री रघुनाथदादा पाटील:-**

यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक हे चुकीची माहिती सांगत आहेत. कुठलाही बॉयलर, टरबाईन बदलण्यात आलेला नाही. इव्हॅपरेशनमध्ये फक्त बदल केलेला आहे. ते योग्य आहे का असा मुद्दा उपस्थित

केला. तसेच त्यांनी अध्यक्षांना विनंती केली की येथील स्थानिक कार्यकर्त्यांनी विस्तारिकरणाचे काम ७०-८०% झाल्याचा आक्षेप नोंदविलेला आहे. ग्रामस्थांच्या वकिलांनीही प्रतिज्ञापत्र देऊन आक्षेप नोंदविलेला आहे की विस्तारिकरणाचे काम विनामंजूरी, विनाअनुमती प्रकल्प प्रवर्तकांनी पूर्ण केलेले आहे. त्यामुळे आपणच निर्णय घ्यावा की विस्तारिकरण झालेले आहे किंवा कसे असे नमूद केले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ही पर्यावरणविषयक जनसुनावणी आहे. या समितीस कुठलाही निर्णय घेण्याचा अधिकार नाही. बैठकीत ग्रामस्थांच्या वकिलांनी सादर केलेले प्रतिज्ञापत्र हे बैठकीच्या इतिवृत्तासोबत शासनास सादर करण्यात येईल. त्याबाबत पुढील निर्णय शासन घेईल असे सांगितले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीच्या सुरवातीसच मी स्वतः स्पष्टीकरण दिलेले आहे कि, ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती ही पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार गठित करण्यात आलेली असून समितीच्या मर्यादा या बैठकीच्या सुरवातीसच सांगण्यात आलेल्या आहेत. या पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प प्रभावित क्षेत्रातील जनतेच्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना,विचार,हरकती या ऐकून त्याची बैठकीच्या इतिवृत्तात नोंद घेणे व पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करणे एवढाच आहे तसेच तेथील तज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेत असते असे सांगितले.

श्री रघुनाथ पाटील यांनी मत मांडले की माझा मुद्दा अध्यक्ष यांनी निर्णय घ्यावा असा नाही. ही जनसुनावणी प्रस्तावित प्रकल्पाविषयी आयोजित करण्यात आलेली आहे. येथे प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आलेले आहे की ८०%काम हे विस्तारिकरणाचे झालेले आहे. कारखाना प्रशासन सांगते की आम्ही आधुनिकीकरण करत आहोत. मग जे प्रतिज्ञापत्र खरे की खोटे हे सांगण्यात यावे असे नमूद केले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की बैठकीत वकिलसाहेबांनी जो मुद्दा मांडला, तसेच त्याबाबत त्यांनी पुढची कार्यवाहीसुध्दा सांगितलेली आहे व मा. वकिलसाहेबांनी जे मुद्दे लेखीस्वरुपात उपस्थित केले, त्याबाबत प्रकल्प प्रवर्तकांकडून लेखीस्वरुपात उत्तर घेण्यात येईल व तो सर्व दस्तावेज शासनास सादर करण्यात येईल व याबाबत पुढील निर्णय हा शासनस्तरावर घेण्यात येईल असे सांगून आपण उपस्थित केलेल्या मुद्द्याची नोंद घेण्यात आलेली आहे असे नमूद केले.

**<u>त्यावर श्री रघुनाथदादा पाटील</u>**

<u>यांनी असा मुद्दा मांडला कि,</u> आता पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आम्ही आपण उपस्थित केलेल्या सर्व सूचना, आक्षेप हे शासनास सादर करण्यात येईल. तर काम पूर्ण झाले तर शासन दंड करणार आहे. तो कारखान्यास होतो. व्यक्तीगत संचालक मंडळाला, प्रकल्प प्रवर्तक अध्यक्ष यांना होत नाही. कारखाना म्हणजे आम्ही सर्व सभासद. तर आता निर्णय घेण्यात यावा की खरच विस्तारिकरणाचे काम विना परवानगी सुरु झाले की नाही असे नमूद केले.

८) **<u>श्री बाबूराव निवृत्ती पाटील, माजी सरपंच-साखराळे ग्रामपंचायत व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य, तालुका-वाळवा,जिल्हा-सांगली:-</u>**

यांनी असे सांगितले कि, मी लोकनियुक्त सरपंच होतो. माझा मुद्दा आहे की प्रकल्प प्रवर्तक पहिल्यांदाच विस्तारिकरण करत नाही. गेले ६० वर्षे कारखाना चालू आहे. पूर्वी १२०० टीसीडी क्षमतेचा २,५०० टिसीडी झाला, ५,००० टीसीडीचा ७,००० टीसीडी झाला. वेळोवेळी शासनाची अनुमती ही घेण्यात आलेली आहे. या कारखान्याच्या उभारणीमुळे तालुक्यातील शेतीला, उद्योगांना चालना मिळालेली आहे. शेतीचा दर्जा उंचावला आहे. उत्पन्न वाढले, आमचा सामाजिक दर्जा उंचावलेला आहे. कारण आम्ही पिकविलेल्या पिकाचे साखरेत रुपांतर करुन आम्हां सभासदांना त्याचे पैसे दिले जातात. दोन पिढ्यांपुर्वी आमची मातीची घरे होती, ती आता आर.सी.सी. घरे झालेली आहेत. येथील आरोग्यव्यवस्थेत सुधारणा झाल्याने आमचे आरोग्य सुधारलेले आहे. ज्यांनी बैठकीत विस्तारिकरणास विरोध केला, ते कारखान्याचे पारंपारिक विरोधकच आहेत असे नमूद केले.

तद्नंतर काही लोकांचा समुह हा एकत्रित येऊन पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीसमोर उभे राहून येथे राजकारणाचा मुद्दा उपस्थित करु नये असे म्हणत मोठ्याने गलका करुन बोलू लागले. त्यावर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्वांना जागेवर बसून शांतपणे मुद्दे उपस्थित करण्याचे आवाहन केले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की, आपण प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाबाबत तांत्रिक, पर्यावरणीय सूचना, आक्षेप उपस्थित करण्यात याव्यात तद्नंतर आयोजक यांनी सांगितले की, आपणाकडून इतर कोणाच्याही मुद्द्यावर आक्षेप घेण्यात येऊ नये तसेच आपसात चर्चा करत बसू नये असे सांगितले.

**तद्नंतर श्री बाबूराव निवृत्ती पाटील,** यांनी सांगितले की या पूर्वीच्या पिढीला शेतीला येथे पाणी नव्हते, अल्प उत्पन्न होते. कारखान्यामुळे सिंचनाची व्यवस्था झाली, शेतीला पाणी मिळाले. त्यामुळे शेतीच्या उत्पन्नात वाढ होऊन आमचा आर्थिक, सामाजिक स्तर उंचावला. कारखाना ही आमची मातृ-संस्था असल्यासारखी आहे असे मत मांडले तसेच प्रदूषण नियंत्रण व प्रदूषण मुक्त परिसर करण्यासाठी अत्याधुनिक सयंत्रणेची उभारणी कारखान्याने करावी असे सांगितले तसेच कारखाना विस्तारिकरणास आमचा पाठिंबा आहेअसे नमूद करुन त्यांनी उपस्थितांना हात वर करुन पाठिंबा दर्शविण्याचे आवाहन केले.

त्यावर मा.अध्यक्ष,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रत्येक व्यक्तीने फक्त आपले मत मांडावे व दुस-याला मत मांडू द्यावे तसेच दुस-यांना पाठिंबा देण्यास सांगू नये असे सांगितले.

**९) श्री विनोद राजाराम बाबर, राहणार-साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली:-**

यांनी सांगितले कि, हा कारखाना कार्यान्वित होण्याअगोदर आमच्या साखराळे गावातील बरेच लोक मजुरीसाठी बोरगावाला जात होते मात्र कारखान सुरु झाल्यानंतर आमची उन्नती झाली. माझे उत्पन्न एकरी पूर्वी २०-४० टन होते, ते आता १४०.० टनपर्यत जात आहे. आमच्या परिसरातील ऊस आम्ही दुस-या कारखान्यात घालवू लागलो कारण येते कारखान्याची उत्पादन क्षमता कमी होती. त्यामुळे १५,००० टन प्रतिदिनाबरोबरच हा कारखाना २५,००० टन प्रतिदिनपर्यत कारखान्याचे विस्तारिकरण व्हावे अशी आमची इच्छा आहे असे मत मांडले. तसेच येथिल उच्चप्रतीचा ऊस

आम्ही येथे क्षमता नसल्याने बाहेर देऊ लागलो. तसेच आमची मुले इंग्रजी माध्यमातून एलकेजीला प्रवेश घेतला की ज्युनियर कॉलेजपर्यत येथेच शिकत आहेत व या कारखान्यामुळे आमचा विकास झालेला आहे असे नमूद केले.

१०) **श्री तानाजीराव जनार्दन पाटील, राहणार-बोरगाव,तालुका-वाळवा,जिल्हा-सांगली:-**

यांनी सांगितले कि, भविष्यातील कारखाना विस्तारिकरणास माझा पूर्ण पाठिंबा आहे. कारखाना कार्यरत झाल्याने येथील जमिनीची किंमत गुंठा दोन लाखापर्यत गेलेली आहे. या कारखान्याने वाळवा तालुक्यातील तीस हजार हेक्टर क्षेत्र बागायतीखाली आणलेले आहे. या तालुक्यात कसाबसा १०० कोटी रुपयांचे ऊस उत्पादन होते, तेथे आता ७००-८०० कोटी रुपयांचे ऊसाचे उत्पादन होत असते. तसेच ग्रामस्थ फक्त एका व्यक्तीचा विचार करत नाही, तर समाजाचा विचार करत असतो असे मत मांडून त्यांनी १५,०००.० टन प्रतिदिनच का २५,०००.० टन प्रतिदिन गाळप क्षमतेचा हा कारखाना व्हावा असा आमचा मानस आहे असे नमूद केले.

**११) श्री जितेन्द्र लक्ष्मण पाटील, बोरगाव सरपंच, तालुका-वाळवा,जिल्हा-सांगली:-**

यांनी सांगितले कि, कार्यरत कारखान्यामुळे आमच्या ओढ्याला खराब पाणी येत आहे, त्यामुळे पिण्याचे पाणी खराब होणे, दुषित पाण्यामुळे शेतीचे होत असलेले नुकसान आणि दुषित पाण्यामुळे स्थानिक मासेमारीवर परिणाम होत आहे असे नमूद केले व त्याचप्रमाणे कारखान्याने जो नविन बॉयलर कार्यान्वित केलेला आहे त्यामुळे प्रदूषण होत असून परिसरातील शिंदेमळा, शिवाजीनगर, सलगर वस्ती इ. ठिकाणी राहणा-या नागरिकांना श्वसनाच्या त्रासात वाढ झालेली आहे असे सांगितले. त्याचप्रमाणे गावाच्या पश्चिमेकडील तसेच बोरगावची जमिन खराब झालेली असून विहिरी खराब झालेल्या आहेत व हवेच्या प्रदूषणामुळे तेथील लोकांच्या आरोग्यावर दुशपरिणाम होत आहे असे नमूद केले.

त्यावर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की आपण आपले मुद्दे थोडक्यात सादर करावेत, तसेच पूर्वी झालेले मुद्दे परत परत मांडू नयेत जेणेकरुन जास्तीतजास्त लोकांना सहभाग घेता येईल असे सांगितले.

१२) **श्री . शंकर भीमराव मोहिते, राहणार-साखराळे, तालुका- वाळवा, जिल्हा-सांगली, अध्यक्ष, शेतकरी संघटना, सांगली जिल्हा:-**

यांनी सांगितले कि बैठकीत उपस्थितांनी जल, हवा, माती प्रदूषणाबाबत सूचना, आक्षेप नोंदविलेले आहेत. माझा मुद्दा तसाच आहे. मी या कारखान्याचा सभासद असून आमचा या कारखाना विस्तारीकरणास विरोध आहे. तर माझा आक्षेप असा आहे की यापूर्वी या कारखान्याचे गाळप सुमारे २२ लाख होत होते, ते आत्ता १५-१६ लाखावर आलेले आहे. आमचा विकासाला अजिबातच विरोध नाही. पूर्वी ७,००० टन कारखान्याची गाळप क्षमता आहे. बैठकीत ग्रामस्थांना पाणीपुरवठा हा फिल्टर करुन देत असल्याचे सांगितले परंतु ते केलेले नाही, तर १५,००० टन गाळप क्षमता झाल्यावर कधि करणार? असा मुदा उपस्थित करुन सध्या ७,००० टन कारखान्याची गाळप क्षमता असतानाचे फिल्टर कुठे गेले? असे नमूद केले तसेच कारखाना प्रशासनास दुसरीकडे युनिट उभारण्यासाठी आम्ही कधिच विरोध केलेला नाही. पूर्वी आम्ही कवठेमहांकाळ, वाटेगावला कारखाना काढण्यासाठी आम्ही संमती दिलेली होती. तर एवढे प्रदूषण असताना विस्तारिकरणाची काय आवश्यकता आहे ? असा मुद्दा उपस्थित केला तसेच येथे विस्तारिकरण करण्याऐवजी दुसरीकडे

कारखाना काढावा. आम्ही त्यास संमती देऊ असे सांगितले व ब-याच लोकांनी प्रदूषणाबाबत तक्रारी नोंदविलेल्या आहेत. तरी आमचे आक्षेप हे शासनास कळविण्यात यावेत असे मत मांडले.

त्यावर प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले कि, प्रकल्पात अत्याधुनिक सयंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली असून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर आपण प्रकल्प उत्पादन क्रियेत करत आहोत. प्रकल्पातील कुठलेही सांडपाणी हे प्रकल्पापबाहेर सोडण्यात येत नाही. याची नोंद घेण्यात यावी. तसेच प्रकल्प अत्याधुनिक करण्याचे काम चालू आहे. कारण प्रकल्प हा १९६९-७० साली सुरु झाल्याने ब-याच मशिनरींची कार्यक्षमता ही कमी झालेली होती. तसेच प्रकल्पातील प्रदूषणाची पातळी ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या मानकांच्या पेक्षा कमी आहे. तसेच भविष्यात जशी गरज असेल, त्याप्रमाणे शासकीय नियमांच्या अधिन राहूनच प्रकल्पाचे आधुनिकीकरण करण्यात येईल. तसेच कारखान्याकडे सांडपाणी नियंत्रण संयत्रणा उपलब्ध असल्याचे सांगितले.

**१३) <u>श्री रघुनाथदादा पाटीलः-</u>**

यांनी सांगितले कि, आता आमच्या कार्यकर्त्यांनी परत सांगितलेले आहे की प्रकल्पातील सांडपाणी कसे बाहेर जलस्त्रोतात व नदीत कसे जाते. जिल्हाधिकारीसाहेब, आपणास आमचे कार्यकर्ते व मी स्वतः आताही प्रकल्पातील सांडपाणी कसे बाहेर जलस्त्रोतात व नदीत कसे जाते हे दाखविण्यास तयार आहोत. आम्ही मोठे आंदोलन केले, त्यामुळे आसवणी प्रकल्प हा बंद करण्यात आला. तर प्रकल्प प्रवर्तक असे सांगतात की कारखान्यातील सांडपाणी हे बाहेर जात नाही, तर त्यांनाही आम्ही दाखविणे आवश्यक आहे काय? अशी वियारणा केली व येथे प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले तसे काहीही मळीचे पाणी जात नाही. आमच्याकडे वॉटर टेबल आहे व काहींनी प्रकल्प प्रवर्तक यांनी मळीचे पाणी बाहेर जात असल्याचा व्हिडिओ त्यांना पाठविल्याचे सांगितले. त्यावर उपस्थित आपसात मोठमोठ्याने चर्चा करुन आक्षेप नोंदवित होते.

त्यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्वांना आवाहन केले की आपसात चर्चा न करता प्रत्येकाने थोडक्यात आपले मुद्दे मांडावेत. एखाद्याने मुद्दा मांडल्यास त्यावर भाष्य करु न करता आपण आपला मुद्दा उपस्थित करावा असे आता मा. जिल्हाधिकारी-सांगली तथा अध्यक्ष यांनी आदेश दिलेले आहेत असे सांगितलि. तसेच आपल्या सर्वांच्या मुद्यांची नोंद घेण्यासाठीच ही जनसुनावणी बैठक आयोजित करण्यात आलेली असून सर्वांच्या मुद्द्यांची नोंद घेण्यात येईल नमूद करुन एकएकाने आपले मुद्दे थोडक्यात मांडावेत. आपण स्टेजजवळ येऊ नये. ज्यांना सूचना उपस्थित करावयाची आहे, त्यांनी हात वर करावा, त्यास माईक देण्यात येईल असे सांगितले.

त्यावर श्री रघुनाथदादा पाटील_यांनी सांगितले की येथे जो गोंधळ झाला, त्यास कारण कारखान्याच्या एका समर्थकाने आम्ही पारंपारिक विरोधक आहोत ही टिप्पणी केल्याने गोंधळ झाला. आम्ही गोंधळ घालायला आलेलो नाही. जर कारखानाच्या अध्यक्षकांनी व संचालक मंडळाने सदरहू विस्तारिकरण प्रस्ताव जर एकमताने मंजूर केलेला असेल, तर ते येथे येऊन काय उत्तर देणार? कारण ही बैठक पर्यावरणविषयक आहे. तर कोणी किती ऊस दिला हे सांगत असताना त्यास मज्जाव करणे आवश्यक होते. ही कारखान्याची जमिन ही साखराळेच्या हरिजन मंडळीची आहे. ही सर्व जमिन माझ्या वडिलांच्या नावे होती. मात्र माझ्या वडिलांनी हक्क सांगितला नाही, तर हरिजन मंडळीची आहे असे सांगितले. हरिजन समाजातील कार्यकर्त्यांनी फेटे उडवून कारखान्यासाठी जमिन दिली असे नमूद केले. परंतु येथे बैठकीत काहींनी जो क्षोभ केला, कारण प्रकल्प प्रवर्तक धादांत खोटी माहिती देत आहेत असे सांगितले कारण ऊस उत्पादन वाढल्याने प्रकल्पाचे

विस्तारिकरण करत असल्याचे सांगितले. परंतु येथे कारखान्याची गाळप क्षमताच कमी झालेली आहे. येथील ऊस उत्पादन कमी झालेले असुन संचालक मंडळाने सादर केलेला प्रस्ताव हा धादांत खोटा आहे. गरज नसताना विस्तारिकरण करण्याता प्रस्ताव कारखाना प्रवर्तक यांनी ठेवला असल्याचे मत मांडले. तसेच आता वीज उत्पादन विस्तारिकरण प्रस्ताव आहे. तर सोलरवीज निर्मिती आता सगळीकडे होत असताना प्रकल्प प्रवर्तक बगॅस जाळून वीज निर्मितीचे नियोजन का करत आहेत असा सर्व कार्यकर्त्यांना प्रश्न निर्माण झालेला आहे असे मत मांडले.

तसेच बगॅस दुसऱ्या कारणांसाठी वापरला तर त्यास जास्त भाव येतो. येथे बगॅसपासून वीटनिर्मिती करणारे उत्पादक आहेत, त्यांना भाव विचारला असता त्यांनी ₹ ४,०००/- प्रति टन भाव सद्या आहे असे सांगितले. बगॅसपासून वीटानिर्मितीमुळे समाजातील काही घटकांना फायदाच होणार आहे. तसेच देशाचे मा. पंतप्रधान व इतर सर्व तज्ञ मंडळी सोलर वीजनिर्मिती करण्यास प्रोत्साहन देत असताना येथे बगॅस जाळून वीजनिर्मिती करण्याचे काय प्रयोजन आहे असा मुद्दा उपस्थित करुन यास सर्व ग्रामस्थांचा विरोध असतानाही बगॅस जाळून वीजनिर्मिती करणे योग्य नाही असे नमूद केले. तर येथे वीजनिर्मिती केल्याने रोजगारात वाढ होईल असे कारखाना प्रवर्तक सांगत आहेत परंतु आता कारखान्यात रोजगार निर्मिती करुन त्यास अत्यंत अल्प वेतन देण्यात येत असल्याचे सांगितले.

तसेच सादरीकरणात दर्शविण्यात आले की कारखान्यात प्रदूषणाची पातळी ही पारित मानकांपेक्षा कमी असल्याचे प्रतिपादन केलेले आहे असे नमुद केले. जर मातीत योग्य घटक आहेत, तर ऊस उत्पादन कमी का होते याबाबत स्पष्टीकरण अहवालात नाही. जर कारखान्यामुळे सुबत्ता आली असे सांगतात, तर येथील लोकप्रतिनिधी यांनी जयंत दारिद्र्य निर्मुलन योजना का तयार केली ? असा मुददा उपस्थित केला. या विस्तारिकरण प्रकल्पास सर्व गावातील ग्रामस्थांचा विरोध आहे. ते एवढ्या पोटतिडकीने का विरोध करतात, येथील शेती, माणसांवर कारखान्याच्या प्रदूषणाचा परिणाम होत आहे. तरी हा विस्तारिकरण प्रस्ताव फेटाळण्यात यावाअसे नमूद केले.

१४) **श्री राजेन्द्र जयसिंग पाटील, राहणार-साखराळे, तालुका- वाळवा, जिल्हा-सांगली:-**

यांनी असे सांगितले कि, येथे प्रदूषणाचा मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे. तर ज्याज्या वेळी प्रदूषणाचा काही मुद्दा आला, त्यात्या वेळी अद्यावत्त प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा प्रकल्पात कार्यान्वित करुन प्रदूषण नियंत्रणाचे काम केलेले आहे. कारखान्याच्या माध्यमातून कारखान्याच्या पश्चिम भागात जे स्टेडियम उभारलेले आहे. सकाळी चार वाजल्यापासून रात्री आठ वाजेपर्यत येथील सर्व वयातील लोक, युपीएससी,एमपीएससी परिक्षेस बसलेले विद्यार्थी हे व्यायामास, फिरण्यात येतात. त्यांना कारखान्याच्या प्रदूषणाचा त्रास होत असता, तर तेथे आले नसते असे नमूद केले. तसेच ज्या ज्या वेळी एखादा प्रदूषणाचा प्रश्न उपस्थित झाल्यास, कारखाना व्यवस्थापक त्यावर उपाययोजना करत असतात असे सांगितले. तसेच आम्ही तालुक्यातील १५,०००-२०,००० शेतकरी ऊस व इतर पीकांची लागवड करत असतो. ऊसपीक हे हवेतील कार्बन शोषून घेत असतो. तर कारखान्यामुळे जर २% प्रदूषणाचा त्रास होत असेल व ८०% लोकांना कारखान्याचा फायदा होत असेल, तर ८०% लोकांचा विचार करावाच लागेल व या प्रकल्पास विस्ताकरणाची परवानगी मिळालीच पाहिजे असे मत व्यक्त केले.

यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की अगोदर मुद्दा उपस्थित केला असल्यास परत परत तोच मुद्दा उपस्थित करु नये. तसेच एखाद्या व्यक्तीने मुद्दा उपस्थित केल्यास त्यास दुस-या व्यक्तीने प्रतिरोध करु नये असे सांगितले.

१५)**श्री अतुल अविनाश पाटील,राहणार-साखराळे, तालुका वळवा, जिल्हा-सांगली:-**

यांनी सांगितले कि, माझा १९८६ सालचा जन्म आहे. बालपण पुर्णपणे साखराळेत गेलेले आहे. जेव्हापासून कळायला लागले, तेव्हापासून आम्ही पहातो की हंगाम सुरु झाला की घराच्या गच्चीवर, घरात हमखास राख येत असते. ती संपूर्ण हंगामात पडत असते. हंगाम चालू असताना येथील हवा गुणवत्ता इन्डेक्स हा शंभराच्या वर असतो, तर कारखाना बंद असताना तो ५० च्या आत असतो. परदेशात हवा गुणवत्ता इन्डेक्सवरुन सरकार पडते, मात्र आपल्या जनतेस हे कळत नाही. आता प्रकल्प ७,००० टन प्रतिदिन असताना एवढा त्रास होतो, तर विस्तारिकरण झाल्यांनंतर किती होईल याचा अंदाज केलेला बरा. आम्ही कारखानाच्या शेजारीच राहतो. मळीचा अत्यंत घाण वास येत असतो. ती मळी कृष्णा नदीत मिसळत असल्याचा मी त्याचा व्हिडिओ प्रकल्प प्रवर्तकांना पाठविलेला आहे परंतु त्यांनी उत्तर दिलेले नाही असे नमुद केले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना लेखीस्वरुपात आक्षेप नोंदविण्याची सूचना केली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी त्याबाबत पुढील कार्यवाही करतील असे सांगितले.

१६) **श्री विश्वास जगन्नाथ पाटील, राहणार-नेर्ले,**

यांनी असे सांगितले कि, आमच्या गावातील जमिन क्षारपड असून कमी उत्पादन होत असते. तरी कारखान्याच्या माध्यमातून क्षारपड जमिनीसाठी उपक्रम राबविण्यात आलेला आहे. ऊसपीकाचे गाळप लवकर होण्यासाठी, तसेच इतर पीके, गहू पीक व इतर पीके यामुळे शेतक-यांचा फायदाच होईल व नेर्ले ग्रामस्थांचा विस्तारिकरणास पाठिंबा आहे असे मत व्यक्त केले.

१७) **श्री किरण मोहन माने,राहणार-साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली:-**

यांनी, असे सांगितले कि, माझी जमिन कारखान्याच्या गट नं. ११५२ मध्ये अजूनही आहे. तेथे आम्हांला जायलासुध्दा रस्ता नाही. त्यामुळे आम्हांला काहीही करता येत नाही. पहिला सहविद्युत प्रकल्प झाला, तेव्हा माझी सहा गुंठे जमिन होती. पण काही कारणास्तव माझी थोडी जमिन ठेवली. आता दीड गुंठा जमिन आहे असे नमूद केले.

१८) **श्री सुनील सचिन सुर्यवंशी:-**

यांनी असे सांगितले कि, पलिकडच्या बाजूस माझे घर आहे. आमचे नातेवाईक येथेच राहतात. त्यांची परिस्थिती तेवढी नाही. त्यांच्या घरात बगॅस पडतो. येता-जाता बगॅस डोळ्यात जातो. मात्र आमच्या तक्रीरीची दखलसुध्दा घेतलेली नाही. कारखान्यातून मळी सोडली असता आम्ही कितीतरी वेळा प्रकल्प अधिका-यांना दाखविलेले आहे. परंतु कारखाना प्रवर्तकांनी त्याची दखल घेतली नसल्याचे नमूद केले.

**१९)श्री राजेश शंकर पाटील, राहणार-कापूसखेड-**

यांनी सांगितले कि, कारखान्याच्या माध्यमातून परिसरात विकास झालेला आहे. कापूसखेडला कारखान्याच्या प्रदूषणाचा काहीही त्रास होत नसून विस्तारिकरण होणे गरजेचे आहे. त्यास आमच्या गावाचा पाठिंबा आहे असे मत व्यक्त केले.

२०) **सौ. सुजाता डांगळे, सरपंच, साखराळे ग्रामपंचायत, तालुका-वाळवा,जिल्हा-सांगली:-**

यांनी असे सांगितले कि, या कारखान्याचे नुतनीकरण व विस्तार होत असेल, तर साखराळे ग्रामस्थांतर्फे यास मी पूर्ण पाठिंबा देत असल्याचे मत व्यक्त केले.

२१) **सौ. योगिता रामचंद्र सुर्यवंशी, साखराळे तालुका-वाळवा,जिल्हा-सांगली:**

यांनी असे सांगितले कि, आमचा प्रकल्पास विरोध नाही. पण आम्ही कारखान्यापासून दोन मिनिटे अंतरावरच राहणसेस आहोत. कारखान्याच्या धुरांडयामधून येणा-या काळया, पांढ-या राखेचा त्रास आम्हाला होतो, आमची ६-६ महिन्यांची लहान मुले, म्हातारी माणसे येथून बाहेर पाठवत नाही.परांतु कारखाना प्रवर्तकांनी होणा-या राखेच्या त्रासाचे निमार्जन करावे असे मत व्यक्त केले.

२२) **सौ. आरती शशिकांत माने:- साखराळे तालुका-वाळवा,जिल्हा-सांगली:**

यांनी सांगितले कि, प्रकल्पास पाठिंबा देणारे गावात राहतात. आम्ही कारखान्यापासून फक्त १०-१५ फुटांवर राहतो. आम्हांला बगॅसचा त्रास होतो. त्याची आपण दखल घ्यावी असे त्यांनी नमूद केले.

२३) **सौ. मनिषा माने, साखराळे तालुका-वाळवा,जिल्हा-सांगली:**

यांनी असे सांगितले कि, आमचे घर दोन मिनिटांच्या अंतरावर आहे. आम्हांला राखेचा खूप त्रास होतो. आमचे घरी सरपंचांना आणून दाखविलेले आहे. मुलांना त्रास होतो. राख अन्नात, विहिरीच्या पाण्यात पडते. पाहुणे घरी आले की म्हणतात जसा पाऊस पडतो, तशी राख तुमच्या घरात पडते. विस्तारिकरणमुळे आम्हांला बराच त्रास होणार आहे असे नमूद केले.

त्यावर आयोजक यांनी आपला मुददा कळला असून त्याची दखल घेण्यांत येईल असे सांगितले.

२४) **श्री दादासाहेब राजाराम पाटील साखराळे तालुका-वाळवा,जिल्हा-सांगली:**

यांनी असे सांगितले कि, मी कारखान्याला लागूनच राहतो. कारखाना १९६८ साली चालू झाला म्हणजे ५५ वर्षे झाली. कारखानाच्या लाभक्षेत्रात माझे चार एकर क्षेत्र येते. कारखान्यातून सोडलेले पाणी माझ्या क्षेत्रामध्ये येते. मी कारखाना प्रशासनास भेटलो व ५५ वर्षांचा किती हिशोब होईल याबाबत विचारणा केली असल्याचे त्यांनी सांगितले व माझे जे वैयक्तिक नुकसान झाले, त्यास जबाबदार कोण? तरी माझी नुकसान भरपाई देण्यात यावी._येणारे पाणी कायमचे थांबवावे असा मुददा उपस्थित केला तसेच ते झाले नाही तर कायदेशीर कारवाई करण्यास मी अजिबात घाबरणार नाही असे नमूद केले.

२५) **श्री दत्तात्रय पाटील, राहणार-साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली:-**

यांनी असे सांगितले कि, येथे बैठकीत साखराळे गावातील लोकांनी प्रकल्पास पाठिंबा दिला असेल परंतु येथील हवामान प्रदूषणामुळे खराब आहे. मात्र साखराळे गावातील बरीच माणसे ईश्वरपूरला (पूर्वीचे इस्लामपूर) जाऊन राहतात. त्रास कोणाला आहे जे येथे राहतात. कारखान्याच्या कंपाऊंड भिंतीचे आणि साखराळे गावाचे अंतर हे दहा फुटाचे आहे. कारखान्याने विस्तारिकरण केल्याने तो गावातच आला. जे लोक येथे कारखान्याचा त्रास नाही म्हणतात. त्यांनी तो सहन करावा. बैठकीत माझ्या सहका-यांनी सांगितलेच आहे की हवा गुणवत्तात येथील ११० आहे. या परिस्थितीत आम्ही राहतो. तरीही आपण म्हणता की हे साखराळे ग्रामस्थांनी सहन करावे. हे प्रत्येकवेळी आम्ही सहन करणार नाही. बगॅसची राख आमच्या गावात पडते. येथील रस्ता कारखान्याने बंद केला. फक्त दुचाकी वाहनांनीच जावे म्हणून बंद केला. इनडोअर स्टेडियमला रस्ता बंद केला. कारखाना आमच्या गावाच्या हद्दीत, आम्ही येथील गावकरी, पण आम्हीच रस्त्याने जायचे नाही. या गोष्टींचा विचार करणे गरजेचे आहे असे मुद्दे त्यांनी उपस्थित केले.

२६) **श्री विकास आंनदराव पाटील, राहणार-साखराळे, तालुका- वाळवा, जिल्हा-सांगली:-**

यांनी असे सांगितले कि, हंगाम सुरु झाला की एवढी राख पडते की आमचा जीव गुदमरुन जातो. त्यात मधला रस्ता बंद केलेला आहे म्हणजे तोंड दाबून बुक्क्याचा मार आम्ही खात आहोत. जीव मुठीत घेऊन कारखान्याच्या बाजूने जावे लागते. आता विस्तारिकरण कशासाठी करत आहात. हा सभासदांचा पैसा आहे, सभासदांचा कारखाना आहे. तरी प्रत्येक सभासदाचे हीत लक्षात घेऊन कारखाना चालविला पाहिजे. विस्तारिकरणाचे काम ८०-९०%पूर्ण झाल्यानंतर आपण परवानगीसाठी ही बैठक बोलाविली आहे असे नमूद करुन हा कारखाना वैयक्तिक नाही, तर सभासदांच्या मालकीचा आहे. कारखान्याचा फायदा तोटा हा सभासदांचा फायदा तोटा आहे. त्यामुळे कारखाना हा चांगलाच चालविला गेला पाहिजे असे मत त्यांनी व्यकत केले.

**२७) श्री रघुनाथ धोंडिराम उबाळे, माजी सरपंच उबाळेवाडी, जिल्हा-सांगली:-**

यांनी असे सांगितले कि, प्रकल्पाचे विस्तारिकरण करणे काळानुसार गरजेचे आहे. कारण प्रत्येक शेतक-याला आपला ऊस लवकरात लवकर गाळपासाठी जावा असे वाटते. शेजारील कारखान्याचे गळीत मे.टनात वाढलेले आहेत. त्यामुळे या कारखान्यातील कार्यक्षेत्राचा ऊस शेजारील कारखान्यात जातो, त्यामुळे ऊसाच्या गळितावर परिणाम होतो. तरी प्रदूषणाची सर्व सयंत्रणा कार्यक्षमतेने चालवून प्रदूषण नियंत्रण करुन विस्तारिकरण होणे गरजेचे आहे असे सांगून आमचा उबालवाडी ग्रामस्थांचा विस्तारिकरणास पाठिंबा आहे असे मत व्यक्त केले.

**२८) श्री प्रकाश महादेव वाटेगावकर, माजी सरपंच, बोरगाव, तालुका-वाळवा,जिल्हा-सांगली:-**

यांनी असे सांगितले कि, आमच्या बोरगावाचे बागयतक्षेत्र जास्त आहे जवळजवळ ९०% ऊस क्षेत्र आहे. त्यामुळे शेतक-यांचा ऊस लगेच गाळपास जात नाही. त्यामुळे आम्हांला दुसरे पीक घेण्यास वेळ लागतो. त्यामुळे प्रकल्पाच्या विस्तारिकरणास आमच्या गावातर्फे पाठिंबा आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.

त्यावर आयोजक यांनी सांगितले की अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्याशी चर्चा केल्यानंतर सर्वांना सूचना करण्यात येते की जे मुद्दे मांडण्यात आलेले आहेत, त्याची पुनरावृत्ती टाळावी. नविन मुद्दे असल्यास ते मांडण्यात यावेत.

२९)**श्री प्रकाश राजाराम पाटील, राहणार-साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली:-**

यांनी असे सांगितले कि, १९६९ ला कारखाना उभारणीचे प्रयत्न सुरु झाले व नंतर कारखान्याची उभारणी झाली. वेळोवेळी ऊस गाळप क्षमता विस्तारिकरण झाले. साखर कारखान्यामुळे येथील स्थानिकांना रोजगार उत्पन्न झाला.येथे शैक्षणिक संस्था, दूध संस्था आल्या. वाळवा तालुक्याचा सर्वांगीण विकास झाला. तरी विरोध करायचा म्हणून करु नका. कारखान्यानेसुध्दा योग्यप्रकारे प्रदूषण नियंत्रण करावे तसेच प्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबा असल्याचे मत व्यक्त केले.

३०)**श्री अशोक पाटील, सामाजिक कार्यकर्ता, राहणार-साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली:-**

यांनी असे सांगितले कि, ज्या विषयासाठी ही जनसुनावणी आयोजित करण्यात आली, तो विषय बाजूलाच जात आहे. तसेच ब-याच स्थानिकांनी, ग्रामस्थांनी मत मांडले की शेतक-यांचा ऊसाचे वेळेत गाळप झालेले पाहिजे. यात दुमत असण्याचे कारणच नाही. मात्र साखराळे गावाने काय सोसले हे पाहिले पाहिजे. तसेच या साखराळे गावची चांगली जमिन ही कारखाना व एक विशिष्ट समाजाच्या ताब्यात आलेली आहे. आणि जी जमिन काळी व क्षारपट आहे, त्यात कारखान्यातील मळी जाते. त्याची पाहणी करुन पुढील कार्यवाही करण्यात यावी असे त्यांनी नमूद केले तसेच बैठकीत आक्षेप नोंदविण्यात आला की विस्तारिकरणाचे काम ८०-९०%पूर्ण झालेले आहे. तर त्याची पाहणी करण्यात यावी असे मत व्यक्त करण्यांत आले. विकासाबरोबरच येथील साखराळे ग्रामस्थांचे आरोग्य व जीव महत्वाचा आहे. साखराळे गावातील लहान मुल ते वरिष्ठ नागरीक यांचे आयुष्यमान कमी होण्याची वेळ आलेली आहे. याबाबतही विचार करण्यात यावाअसा मुद्दा उपस्थित करण्यांत आला.

३१) **श्री रघुनाथदादा पाटील:-**

यांनी असे सांगितले कि, मला दोन मुद्दे मांडावयाचे आहेत. येथे बैठकीत खूप लोकांनी सांगितले की ऊसगाळप हे लवकर झाले पाहिजे. तसेच हे लक्षात घ्या हा कारखाना किती महिने चालला. पूर्वी ६-६ महिने कारखाना चालत असत. यावर्षी तीन महिनेच कारखाना चालला, आणि गाळप लवकर करायचे म्हणजे काय करायचे. आता तीन महिन्याच्या आतच कारखाना बंद पडायला लागला. मग बंद कारखाना असताना कामगारांचे पगार व इतर अप्रत्यक्ष खर्च (overheads) कोणी सोसायचे? तर ज्याने ऊस पिकविला, त्याच्यात डोक्यावर बसतात. गेले सतरा वर्षे ३,०००/- रुपये तीन हजार इतकाच दर राहिलेला आहे असे मद्दे मांडण्यांत आले. तसेच आता ऊसाच्या एका टनामागे कायकाय असते? ऊसाच्या एका टनामागे १२% पुनर्प्राप्ती (recovery) लागली तर १२० किलो साखर मिळते, तीनशे किलो बॅगस निघतो, ४० किलो मोलॅसिस मिळते- त्यापासून आसवणी प्रकल्पात अल्कोहोल तयार होते. दहा किलो प्रेसमड. या सगळ्याचा हिशोब केला तर ५०० किलो होतो. एक टन वाहतुक करुन तो येथे आणायचा, व त्यापासून जे उत्पादन तयार होते, ते ५०० किलो पाणी आहे ते वाफ करु जाळून टाकायचे ही प्रक्रिया येथे होत असते. ते का करतात तर ऊसतोडणी आणि वाहतुकचा खर्च आमच्या एफआरपीमधून वजा करुन ऊसाची किंमत दिली जाते. म्हणजे वाहतुकीचा खर्च आम्ही शेतकरीच करतो. हा वाहतुकीचा खर्च कारखान्याने करावर पण तसे होत नाही. म्हणजे आज हे

कारखाने वाहतुकीचा खर्च प्रतिटन ₹ ९००,१०००, ११०० असा घेत आहेत. तर आम्ही तो सहन का करायचा. हा आर्थिकदृष्टा चुकीचा पायंडा पाडण्यात आलेला आहे. याचा फायदा हा साखर कारखानदारांनाच होतो. तरी याबाबत आपण लक्ष घालावे असे मुददे उपस्थित केले.

३२) **<u>श्री नानासाहेब बळवंत, राहणार-बोरगांव, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली:-</u>**

यांनी असे सांगितले कि, हवेच्या प्रदूषणाबाबत विचारणा झाली. पण उपाययोजना काय केल्या याबाबत विचारणा केली नाही. तरी हवेच्या प्रदूषणाबाबत उपाययोजना, पाण्याच्या प्रदूषणाबाबत उपाययोजना, योग्य असतील,तर बोरगाव ग्रामस्थांचा प्रकल्प विस्तारिकरणास पाटिंबा आहे असे मत व्यक्त केले.

त्यावर उत्तर देताना पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की हवेच्या प्रदूषण नियंत्रणासाठी प्रकल्पामध्ये बॉयलरसाठी चार फिल्ड असलेला ईएसपी – इलेक्ट्रो-स्टॅटिक प्रेसिपरेटर हे अत्यंत अत्याधुनिक हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा उभारली असून ती सातत्याने कार्यान्वित आहे. तशीच यंत्रणा प्रस्तावित प्रकल्पात बॉयलरला लावण्यात येणार आहे, त्यामुळे सर्व धुलीकणांचा अटकाव होईल असे त्यांनी सांगितले.

तसेच प्रकल्पात औद्योगिक सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा केंद्र (ईटीपी) व त्याचबरोबर सीपीयु (कन्डेनसेट पॉलिशिंग युनिट) प्रस्तावित विस्तारित प्रकल्पात कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**<u>३३)श्री सुनील रंगराव पाटील, राहणार-साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली:-</u>**

यांनी असे सांगितले कि, ब-याच लोकांनी त्याच त्याच सूचना, विचार, आक्षेप नोंदविलेले आहेत. मी त्याबाबत जास्त बोलत नाही. मे. राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना लिमिटेड यांच्या प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार ७,०००.० टन प्रतिदिन वरुन १५,०००.० टन प्रतिदिन आणि सहवीज निर्मिती २८.० मेगावॅट पासून ६८.० मेगावॅट प्रकल्प व्हावा अशी मी मागणी करत आहे व प्रकल्पास माझा पूर्ण पाठिंबा आहे असे त्यांनी सांगितले.

३४) **<u>श्री संजय दादा पाटील, राहणार-ईश्वरपूर,तालुका-वाळवा,जिल्हा-सांगली:-</u>**

यांनी असे सांगितले हा कारखाना सहाकार तत्वावर चालणार आहे. विस्तारिकरणामुळे सर्व सभासदांचा फायदाच होणार आहे. त्यामुळे शेतक-यांत्या ऊसाचे गाळप लवकर होणार आहे. त्यामुळे विस्तारिकरण होणे ही काळाची गरज आहे. ईश्वरपूरच्या लोकांनी या प्रकल्पासाठी आपल्या जमिनी दिलेल्या असून सदर प्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबा असल्याचे सांगितले.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना तेचतेच मुद्दे उपस्थित न करण्याचे आवाहन केले. तसेच मुद्दे हे थोडक्यात सांगण्याचे आवाहन केले.

३५) **<u>श्री अशोक सीताराम खोत, राहणार-ईश्वरपूर,तालुका-वाळवा,जिल्हा-सांगली:-</u>**

यांनी असे सांगितले कि, १९९२ च्या अगोदर ईश्वरपूर भागात पाण्याची कमतरता होती. कारखान्याच्या माध्यमातून काही योजना राबविण्यात आल्या. त्यामुळे ईश्वरपूर भागाचा विकास झालेला आहे. माझ्या स्वतःच्या तीन विहिरी आहेत. त्या विहिरींवर ३० गुंठे एवढे ऊस उत्पादन होत होते. आता

कारखान्याच्या माध्यमातून ऊसाची उत्पादकता १०० टन पर्यत झालेली आहे. याभागातील ब-याच शेतक-यांना पुरस्कार मिळालेला आहे. यावर्षी मला "कृषिभूषण" पुरस्कार मिळालेला आहे असे सांगितले.

यावेळी आयोजक यांनी थोडक्यात मुद्दा मांडण्याची सूचना केली.

तसेच पुन:श्च श्री अशोक सीताराम खोत_यांनी सांगितले की काही वर्षांपूर्वी ईश्वरपुरलासुध्दा या कारखान्यातील राखेचा त्रास होत होता परंतु कारखान्याने नविन सयंत्रणा कार्यान्वित करुन राख कमी केली. त्यामुळे ब-यापैकी राखेचे प्रमाण कमी झालेले आहे असे मत व्यक्त केले.

३६) **श्री जयसिंग कृष्णा पाटील, राहणार-साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली:-**

यांनी असे सांगितले कि, कोयना धरणापासून अलमट्टी धरणापर्यच्या क्षेत्रात जे कारखाने आहेत, त्यात या एकाच कारखान्याचे प्रदूषण होत आहे काय ? महामंडळानेही विचार करण्यात यावा असा मुददा उपस्थित केला. मग येथील सभासदांनी काय केले. सर्वांनाच नियम लागू करण्यात यावेत. मी सकारात्मक विचार करतो. या कारखान्याच्या प्रस्तावित विस्तारिकरणास पाठिंबा असल्याचे त्यांनी नमूद केले.

३७) **श्री उध्दव शंकरराव पाटील, राहणार-तुजारपूर,तालुका-वाळवा,जिल्हा-सांगली:-**

यांनी असे सांगितले कि, माझे गाव येथून ५-७ कि.मी. अंतरावर आहे. तेथे कारखान्याची एकही योजना नाही. तेथील ऊस बाहेरच्या कारखान्यास गाळपासाठी जातो. त्यासाठी कारखान्याचे क्षेत्र वाढले पाहिजे. आमच्या गावाशेजारी साखरवाडी गाव आहे. तेथे कारखान्याची योजना आहे. आमच्या गावात सर्व पट्टा हा क्षारफळपट्टा आहे. आमच्या येथील पडिक शेती कारखान्यामार्फत सच्छिद्र करुन शेती पिकविण्याचे काम कारखान्यामार्फत होत आहे. सहकाराचे सर्व फायदे-तोटे बघितले पाहिजेत. राजरामबापू कारखान्याचा महाराष्ट्रात नावलौकीक असून कारखान्यास न्याय द्यावा ही विनंती आहे असे नमूद केले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे उपस्थितांना आवाहन केले की सुरवातीसच सांगितले की ही जनसुनावणी पर्यावरणविषयक असल्याने प्रस्तावित प्रकल्पाविषयी फक्त पर्यावरणीय सूचना,विचार,टीकाटिप्पणी किंवा आक्षेप उपस्थित करण्यात यावेत असे सांगितले.

३८) **श्री हनमंत निवृत्ती जाधव,माजी ग्रामपंचायत सदस्य, राहणार-उबाळवाडी,तालुका-वाळवा,जिल्हा-सांगली:-**

यांनी असे सांगितले कि, गेले २-३ तास चर्चा चालू आहे. तर मी साधक-बाधक विचार करण्याचे आवाहन करतो. आपल्या घरातही प्रदूषण होतच असते. ते आपण सहन करतो. प्रदूषण बाधित लोक किती आहेत व प्रकल्पापासून फायदा घेणारे किती आहेत हे पहावे. तालुक्याचा फायदा होणार असेल तर तसा विचार करण्यात यावा असे नमूद केले.

३९) **श्री आकाश बाबूराव पाटोळे, राहणार-साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली:-**

यांनी असे सांगितले कि, या कारखान्यापासून ५०० मीटरच्या अंतरावरच आमची मातंग व बौध्द समाजाची वसाहत आहे या प्रदूषणाचा सर्वात जास्त त्रास आमच्या समाजालो होत आहे. वकिलामार्फत जे मुद्दे उपस्थित करण्यात आले, ते सर्व आमच्या आरोग्याशी निगडित आहेत. याची दखल घेण्यात यावी असे नमूद केले.

४०) **श्री शशिकांत भिमराव माने, राहणार-साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली:-**

जमिनीचा प्रश्न असेल, तर ५२ एकर जमिन आमच्या समाजाने कारखान्यास दिलेली आहे. आमच्या गावाचा, आमचा विकास झाला हे नम्रपणे मान्य करत आहे. विकासशील नेतृत्व आम्ही विधानसभेत पाठविलेले आहे. त्याचा आम्हांला अभिमान आहे. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीत उचित बोलणे आहे, तेच मी बोलत आहे. आताच प्रकल्प प्रवर्तक म्हणाले अत्याधुनिक तंत्रज्ञान. हे शब्द गेले चार वर्षे ऐकत आहे. आमच्या सरपंच मॅडम, एक सरपंच म्हणाले विकास झालेला आहे. निश्चितच १००% विकास झालेला आहे. पण आमचा बळी नको एवढेच मला सांगायचे आहे. जो नंबर आहे ११५२, त्या ११५२ मध्येच आम्ही राहतो. बरेचजण म्हणाले की थोडे सहन करा. आम्ही मरायला आलेले आहोत, तर त्याच्यावर काय सुनावणी करायची आहे ती करा असे त्यांनी नमूद केले.

**४१) श्री विजय बळवंत पाटील, प्रकल्प प्रवर्तक:-**

यांनी असे सांगितले कि, मी कारखान्याचा उपाध्यक्ष आहे. येथे आमच्या कारखान्याच्या ऊस गाळप क्षमता विस्तार ७,०००.० टन प्रतिदिनपासून १५,०००.० टन प्रतिदिनपर्यत व सहवीज निर्मिती २८ मेगावॅटपासून ६८ मेगावॅटपर्यत प्रकल्प उभारणीसाठी ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. तसेच बैठकीत काही स्थानिक उपस्थितांनी गैरसमजाने आक्षेप नोंदविलेला आहे की कारखान्याने परवानगी न घेता प्रकल्प विस्तारिकरणाचे काम सुरु केलेले असून ८०%काम पूर्ण झालेले आहे. प्रकल्पाच्या अधिका-यांनी वारंवार बैठकीत स्पष्टीकरण दिलेले आहे की कारखान्यात आधुनिकीकरण करण्याचे काम चालू आहे. कारखाना हा १९६९-७० साली कार्यान्वित झालेला आहे. त्या मशिनरी जुन्या झालेल्या होत्या. त्या बदलणे आवश्यक होते ते काम चालू आहे. आपण आधुनिकतेने या व्यवसायाकडे बघणे अपेक्षित आहे. आधुनिक तंत्रज्ञान येथे आत्मसात करणे गरजेचे आहे असे नमूद केले आहे.

तसेच साखराळे गावातील काही नागरिकांची बगॅसबाबत तक्रार आहे. काहींनी लेखी स्वरुपात सूचना, आक्षेप नोंदविलेले आहेत. त्यांचे स्वागत आहे, त्यांचाही आम्ही निश्चतपणे त्यांना कुठलाही त्रास होऊ नये, म्हणून आम्ही त्याबाबत विशेष लक्ष घालू. यासाठी प्रकल्प आधुनिकीकरण करताना त्यातही काही नविन सयंत्रणा आवश्यक असल्यास त्या कार्यान्वित करण्यात येतील. हे स्पर्धेचे युग आहे. येथील सामान्य सभासद हा उत्पादक-मालक आहे. तर त्या मालकाच्या ऊसाचे वेळेत गाळप होणे अत्यंत आवश्यक आहे. पुर्वी या कारखान्याच्या चार युनिटच्या माध्यमातून आपण २२ लाख टन गाळप केलेले आहे. गेल्या वर्षी कमी गाळप झाले. म्हणजे आपण पिकविलेला ऊस या तालुक्यात आपण सीमा उभ्या केल्या. तो ऊस त्याठिकाणी गेला. सामान्य शेतकरी दुसरे पीक घेता आले पाहिजे, म्हणून इतर ठिकाणी देतो, तर आपण आपल्या कारखान्याच्या गाळप क्षमतेचा विस्तार केला तर आपण दुसरीकडे गेलेल्या ऊसपीकाचे गाळप करु शकू. म्हणून १५,००० टन प्रतिदिन गाळप क्षमता नियोजित केलेली आहे. आपण आपल्या कारखान्याची उत्पादकता वाढू या आपल्या शेतक-यास फायदा होण्यासाठी, त्यास चार पैसे जास्त मिळण्यासाठी प्रकल्प प्रवर्तक प्रयत्न करत आहेत. तरी या सकारात्मक नियोजनास सर्वांनी पाठिंबा द्यावा असे मत व्यक्त केले.

तसेच काही उपस्थितांनी मासे मरतात असा उल्लेख केला. तर कराडला मासे मेले, तर राजारामबापूचे पाणी हे कराडला जाते का याचा विचार करण्यात यावा. तरी या नियोजित प्रकल्प विस्तारिकरण प्रस्तावास मान्यात द्यावी अशी विनंती नमूद करण्यांत आली.

आयोजक यांनी येथे फक्त पर्यावरणाबाबतच मुद्दे बोलण्याची सूचना केली.

४२) **श्री माणिक अनंतराव पाटील, राहणार-बोरगाव,तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली:-**

यांनी असे सांगितले कि, कारखाना १९६८ साली सुरु झाला. कारखाना चालू होऊन ५५-५८ वर्षे झाली. तर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास आज ही पर्यावरविषयक जाहिर जनसुनावणी घेण्याचे कारण काय? मग इतक्या लोकांच्या तक्रारी या प्रकल्पाविषयी का येतात? या मुद्द्योची जिल्हाधिकारी यांनी नोंद घ्यावी. २-३ महिन्यापूर्वी मासे मेले. त्याचा दंड महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांकडून वसूल करण्याता यावा. परवा आदिवासी भागातील शाळेत मुली साप चावून मरण पावल्या. मा. जिल्हाधिकारी यांना विनंती आहे की आपण याबाबत कठोर कारवाई करावी असे त्यांनी नमूद केले.

आयोजक यांनी उपस्थितांना विनंती केली तेच तेच मुद्दे मांडू नका, त्यामुळे नविन व्यक्तींना मुद्दे मांडता येत नाहीत.

४३) **श्री अतुल अविनाश पाटील, राहणार-साखराळे, तालुका-वाळवा, जिल्हा-सांगली:-**

यांनी असे सांगितले कि, स्पेंट वॉश जाळल्यानंतर पांढरा धूर येतो. त्या धुराचा प्रचंड त्रास आहे. तो धूर जर का गावात आला, तर तेथे श्वास घेणे मुश्किल होते. तो धूर वा-याची जशी दिशा असेल, तसा तो गावात खाली येतो. श्वास घेणे मुश्किल होते. त्या धुराची तपासणी करण्यात यावी असे नमूद केले.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी परत उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना,आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन, केले. त्यावर उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. आयोजक यांनी बैठक शांततेने पार पाडण्यास सर्वांनी सहकार्य केल्याबद्दल उपस्थितांचे आभार मानले व मा. अध्यक्ष यांना समारोपाचे दोन शब्द बोलण्याची विनंती केली.

त्यावर मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की ज्यावेळी प्रकल्पाची नव्याने स्थापना होत असते किंवा विस्तार होत असतो, अशावेळी काही विशिष्ट उद्योगांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करणे भारत सरकारच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार बंधनकारक आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी येथे फक्त पिठासन अधिकारी (Presiding Officer) असतो. आपण उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे. पर्यावरण प्रभाव अधिसूचनेतील सर्व निर्देश बैठकीत पाळण्यात आलेले आहेत तसेच ज्या लेखी सूचना/आक्षेप नोंदविण्यात आले, त्यास प्रकल्प प्रवर्तकांनी लेखी स्वरुपात दिलेली उत्तरे ही सुध्दा बैठकीच्या इतिवृत्तासोबत शासनास सादर करण्यात येतील. तसेच काहीजण जर लेखी निवेदन देऊ शकले नाहीत, त्यांनी ती ईमेलव्दारे स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास ईमेल आज संध्याकाळपर्यत म्हणजे १४ ऑगस्ट, २०२६ रोजी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यत पाठवावित. तो सर्व दस्तावेज शासनास सादर

करण्यात येईल.  आपण सर्वांनी ही जनसुनावणी शांततेने पार पाडण्यास सहकार्य केल्याबद्दल आभार मानून त्यांनी आयोजक यांना बैठक समाप्त करण्याची सूचना केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ही जनसुनावणी शांततेत पार पडली त्याबद्दल सर्व उपस्थितांचे आभार मानतो व मा. अध्यक्ष यांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही संपविण्यात आली.

जनसुनावणी पूर्वी, त्यादरम्यान व तदनंतर आलेल्या सर्व टीका, टिपण्या तसेच प्रकल्प प्रवक्त्यांनी दिलेले लेखी म्हण्याच्या छायांकित प्रति या सोबत जोडले आहेत.

**(प्रमोद माने)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सांगली
(अतिरिक्त कार्यभार)

**(निखिल भरत)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर

**(डॉ. मैनाक घोष,भाप्रसे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
जिल्हादंडाधिकारी, सांगली,
जिल्हा – सांगली